ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ]
Total No. of Questions : 26 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
[ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 310-M (RS)**
**Code No. : 310-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ಪ್ರಥಮ ವರ್ಷ
# D.El.Ed. FIRST YEAR
# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಕಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)
# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ
# FACILITATING LEARNING ( LPS )
# FIRST LANGUAGE — MARATHI

**(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)**
**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 07. 10. 2020 ]
Date : 07. 10. 2020 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ]
Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ]

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60
[ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

***सामान्य सूचना :***
i) प्रत्येक उत्तराचे चिंतन करून, संघटन करून लिहीण्यास योग्य व्हावे म्हणुन या पेपरला 3 तास वेळ दिला आहे.
ii) प्रत्येक प्रश्नासाठी ज्या सूचना दिल्या आहेत, त्या सुचनांप्रमाणे उत्तरे लिहा.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य असे एक उत्तर निवडून लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण दिलेला आहे. प्रत्येक प्रश्न सक्तोचा आहे. ( प्रत्येक प्रश्नाला **1** गुण ) : $10 \times 1 = 10$

1. असमानता असलेल्या आजच्या समाजात शिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक समाजाला आपापसात जोडले पाहिजेत. ही व्याख्या करणारी संस्था –

(अ) युनिसेफ (आ) यु० एन० ओ०

(इ) यु० एन० डी० पी० (ई) युनेस्को.

2. मौखिक अभिव्यक्ती म्हणजे हे होय –

(अ) खेळणे (आ) सांगितलेले ऐकणे

(इ) बोलणे (ई) समजावून घेणे.

3. शिक्षण हक्क कायद्यांतर्गत या वयाच्या सर्व मुलांना प्राथमिक शाळेत प्रवेश आणि उत्तम दर्जाचे शिक्षण दिले जाते –

(अ) 6 ते 12 वयाच्या (आ) 6 ते 14 वयाच्या

(इ) 8 ते 14 वयाच्या (ई) 10 ते 12 वयाच्या.

4. ज्ञानात्मक विकास या भाषेमुळे होतो –

(अ) मातृभाषा (आ) राज्यभाषा

(इ) प्रादेशिक भाषा (ई) आंतरराष्ट्रीय भाषा.

5. मुलाला घरची भाषा शिकण्याचे साधन –

(अ) खेळ

(आ) घरच्या लोकांचे अनुकरण

(इ) रडण्याद्वारे आपली आवश्यकता इतरांना सांगणे

(ई) थोरांचे मार्गदर्शन.

6. उच्चारदोष नाहीसे करण्यासाठी हे अत्यंत प्रभावी शैक्षणिक साधन आहे –

(अ) टेपरेकॉर्डर (आ) रेडिओ

(इ) दूरचित्रवाणी (ई) टेलीफोन.

7. शिक्षकाचे वाचन अस असावे –

(अ) उच्चार दोषानुसार असावे (आ) आदर्श असावे

(इ) अस्पष्ट असावे (ई) दोषपूर्ण असावे.

8. वैगान्टीक या मनोवैज्ञानिकाच्या मते बालकाच्या शिकण्याचा महत्वाचा भाग म्हजे –

(अ) शाळा (आ) कुटूंब

(इ) घर (ई) परिसर.

9. भाषेची ग्रहणात्मक उद्दिष्टे ही आहेत –

(अ) वाचन व लेखन (आ) श्रवण व भाषण

(इ) वाचन व श्रवण (ई) लेखन व भाषण.

10. मंदगतीने शिकणाऱ्या मुलांना –

(अ) शब्दांच्या माध्यमातून वर्णन करुन शिकविले पाहिजे

(आ) विविध शैक्षणिक साहित्य वापरुन शिकविले पाहिजे

(इ) शब्दांवर जोर देवून शिकविले पाहिजे

(ई) वर्गातील इतर मुलांच्या प्रमाणेच शिकविले पाहिजे.

## भाग - II

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **दोन** गुण ) : 5 × 2 = 10

11. युनस्को संस्थेच्या म्हणण्यानुसार साक्षरता म्हणजे काय ?
12. भाषा शिक्षणात साहित्याची भुमिका सांगा.
13. प्रकट वाचन आणि मौनवाचन यामधील दोन फरक सांगा.
14. श्रवणातून आनंद मिळविण्यासाठी शाळेत कोणते उपक्रम तुम्ही राबवाल ?
15. प्रारंभीच्या शिक्षणात मुलाच्या घरच्या भाषेची भुमिका थोडक्यात स्पष्ट करा.
16. प्रारंभिक साक्षरता म्हणजे काय ?
17. समावेशक म्हणजे काय ?
18. विद्यार्थ्यांना अक्षर व शब्दांचा परिचय कसा करुन द्याल ?

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नाला निवड दिलेली आहे. त्यातोल कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **5** गुण ) : 8 × 5 = 40

19. अ) 'भाषा हे चिंतनाचे माध्यम आहे.' कसे ते स्पष्ट करा.

**किंवा**

आ) मराठी भाषेच्या शिक्षकांने, विद्यार्थ्यांची भाषा संपन्न करण्यासाठी कोणत्या संधी प्राप्त करुन दिल्या पाहिजेत ?

20. अ) मातृभाषा शिक्षणाचे शिक्षण प्रक्रियेतील महत्व विशद करा.

**किंवा**

आ) मातृभाषा शिक्षकाजवळ उत्तम शिक्षक होण्यासाठी कोणकोणते गुण असणे आवश्यक आहेत ? सविस्तर सांगा.

21. अ) भाषा शिक्षणामध्ये साहित्याची भुमिका स्पष्ट करा.

**किंवा**

आ) भाषण कौशल्य आत्मसात करावयाचे 5 मुद्दे सांगा.

22. अ) 'फलक हा शिक्षकाचा खरा मित्र आहे.' या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

आ) प्राथमिक शाळेतील मुलांचे उच्चारदोष घालविण्यासाठी शिक्षक या नात्याने कोणते उपाय योजाल ?

23. अ) लेखनाचे विविध प्रकार सांगून, पत्रलेखनातील महत्वाचे मुद्दे सांगा.

**किंवा**

आ) सुलेखन म्हणजे काय ? त्याची चार वैशिष्ट्ये सांगा.

24. अ) वाचन कौशल्य अवगत करण्याच्या पायऱ्या सांगा.

**किंवा**

आ) वाचन म्हणजे काय ? ते सुधारण्यासाठी शिक्षक म्हणून तुम्ही काय कराल ?

25. अ) मुलांचा मौखिक विकास आणि साक्षरता यांचा घनिष्ठ संबंध आहे. कसा ते स्पष्ट करा.

**किंवा**

आ) प्रारंभिक साक्षरतेचे महत्व स्पष्ट करा.

26. अ) व्यक्तीतील सुप्तगुण म्हणजे काय ? ते कसे ओळखावेत ?

**किंवा**

आ) शिक्षक म्हणून तुम्ही मुलांच्या अध्ययनाचे मूल्यमापन कसे कराल ? स्पष्ट करा.